वनविभागाचे संगणकीकरण (२४०६ ८६६९) या राज्य योजनेतंर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध अनुदानाची उर्वरीत रक्कम वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफएलडी-२०१८/प्र.क्र.२५४/फ-१०
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १३/०३/२०१९

वाचा :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१२ (८६६९)/२०१८-१९/१४६, दि.०२/०५/२०१८.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एफडीएम-२०१८/प्र.क्र.४६/फ-२, दि.०७/०५/२०१८.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१२(८६६९)/२०१८-१९/८६०, दि.१६/०८/२०१८, पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१२(८६६९)/२०१८-१९/१८१०, दि.१०/०१/२०१९.
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एफएलडी-२०१८/प्र.क्र.२५४/फ-१०, दि.२४/०१/२०१९.
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५/०१/२०१९.
७) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एफएलडी-२०१८/प्र.क्र.२५४/फ-१०, दि.१३/०२/२०१९.
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि.०८/०३/२०१९.
९) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. बीयुडी-२०१९/२४०६/प्र.क्र.१९/ब-१, दि.११/०३/२०१९.

प्रस्तावना :-

वार्षिक योजना सन २०१८-१९ करिता "वनविभागाचे संगणकीकरण" (२४०६ ८६६९) या योजनेकरीता एकूण रु.१०००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास,(महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये एकूण रु.१०००.०० लक्ष चालू/ नवीन बाब प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर केला होता व त्यानुषंगाने वरील संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये ७० % च्या मर्यादेत एकूण रु.७००.०० लक्ष इतक्या चालू/नवीन बाब प्रस्तावास शासन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

तसेच, सन २०१८-१९ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे या योजनेकरीता मंजूर करण्यात आलेला एकूण रु.२३३.४२ लक्ष इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भीय पत्र क्र.४ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास,(महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी विनंती केली होती. त्यानुषंगाने पुरवणी मागणीव्दारे मंजूर रु.२३३.४२ लक्ष निधीपैकी ७० % च्या

मर्यादेत एकूण रु.१६३.३९४ लक्ष इतका निधी वरील संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये अर्थसंकल्पीय प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे.

वित्त विभागाच्या वरील संदर्भ क्र ६.येथील परिपत्रकान्वये सन च्या उर्वरीत १९-२०१८ कालावधीकरीता महसूली लेख्यातील कार्यक्रम खर्चाच्या बाबीवर अर्थसंकल्पीत निधीच्या ८०% च्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास सहमती देण्यात आली आहे, त्यानुषंगाने उर्वरीत १०% निधी)रक्कम रु १००.००.लक्ष (संदर्भ क्र ७.येथील शासन निर्णयान्वये अर्थसंकल्पीय प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे.

संदर्भ क्र. ८ येथील शासन परिपत्रकान्वये वित्त विभागाने सुधारित अंदाजाच्या मर्यादेत निधीचे वितरण करण्यास प्रशासकीय विभागास मान्यता दिली आहे.

महसूल व वन विभागाच्या संदर्भ क्र.९ येथील ज्ञापनान्वये सन २०१८-१९ करीताचे आठमाही सुधारीत अंदाज कळविले असून त्यानुसार या योजनेकरीता रुपये ९८६.७४ लक्ष इतका निधी सुधारीत अंदाजानुसार खर्च व वितरीत करण्यास मंजूर करण्यात आला आहे. सदर योजनेकरीता आतापर्यंत उक्त परिच्छेदांमध्ये उल्लेख केल्यानुसार रक्कम रु.९६३.३९ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सबब, सदर योजनेकरीताचा सुधारीत अंदाजानुसार मंजूर रक्कमेतील उर्वरित निधी रक्कम रुपये २३.३५ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-:

वनविभागाचे संगणकीकरण करणे या योजनेअंतर्गत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विभाग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील संदर्भाधीन पत्रांन्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे आतापर्यंत रक्कम रु.९६३.३९ लक्ष **(२८- व्यवसायीक सेवा रु.१४४.५०९१ लक्ष, ५०- इतर खर्च रु.८१८.८८४९ लक्ष)** निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०१८-१९ करीताचे आठमाही सुधारीत अंदाजानुसार या योजनेकरीता रुपये ९८६.७४ लक्ष इतका निधी खर्च व वितरीत करण्यास मंजूर आहे. सबब, सदर योजनेकरीता मंजूर रक्कमेतील उर्वरित निधी रक्कम **रुपये २३.३५ लक्ष** निधी **(२८- व्यवसायीक सेवा रु.३.४९०९ लक्ष, ५०- इतर खर्च रु.१९.८५११ लक्ष)** इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर योजनेकरीता वितरित केलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ व क्र. ६ वरील अनुक्रमे दि.०२/०४/२०१८, दि. २५/०१/२०१९ व

दि.०८/०३/२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकांतील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखील दक्षता घ्यावी. तसेच वन विभागाचे संगणकीकरण करणे या योजनांकरीता वेळोवेळी निर्गमित केलेल्या धोरणात्मक शासन निर्णयांमधील अटी व शर्तींची पूर्तता केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी. वितरीत करून घेतलेला निधी मंडळे / महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधीमध्ये काढून ठेवता येणार नाही.

३. सदर योजनेवर होणारा खर्च महसूल व वन विभाग, मागणी क्रमांक :- सी-७, प्रधान लेखाशिर्ष:- २४०६, वनीकरण व वन्यजीवन, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, राज्य योजनांतर्गत योजना, (१७) वन विभागाचे संगणकीकरण, (१७) (०१) वन विभागाचे संगणकीकरण (५० - इतर खर्च), (२४०६ ८६६९) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०२/०४/२०१८, दिनांक २७/०७/२०१८, दिनांक ०५/१२/२०१८, दिनांक २५/०१/२०१९ व दि.०८.०३.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकांन्वये आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र/१००८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५.०५.२००९ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१३१७३८३४५२१९ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.03.13 17:43:34 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
७) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२
८) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२
९) कार्यासन ब-१, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
१०) निवडनस्ती, कार्यासन फ-१०